# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)
" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी |
|---|---|
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१०३१-३६ |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६२१००६ |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६११४७१ |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२०२४९ |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२११८६ |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६२८२ |
| | २२६२६७५५ |

Website : http://arogya.maharashtra.gov.in
Email : dhs_2005@rediffmail.com
Email : miscall.18@gmail.com
फॅक्स् दूरध्वनी ०२२-२२६२०२३४/२२६२१०३४ (संचालक)
०२२-२२६७९०४४ (सहसंचालक (रुग्णालये)
०२२-२२६२२१५५ (मुख्य प्रशासकीय अधिकारी)
०२२-२२७०३७८५ (नियंत्रण कक्ष)
०२२-२२६२१०४७ (अंधत्व)
०२२-२२६२५७९९ (खरेदी कक्ष)

जा.क्र.संआसे/विनों/कक्ष १८/ स्वघोषणापत्र/ 6962-7577 /१७.
दिनांक 20 /5/२०१७.

प्रति,

१) कार्यकारी अधिकारी तथा विवाह निबंधक,
बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई
२) आरोग्य अधिकारी तथा विवाह निबंधक, महानगर पालिका (सर्व)
३) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, (सर्व)
४) प्रशासक तथा विवाह निबंधक, कटक मंडळ, (सर्व)
५) मुख्य अधिकारी तथा विवाह निबंधक, नगर परिषद/पालिका, (सर्व)
६) प्रशासक तथा विवाह निबंधक, नगर पंचायत, (सर्व)
७) ग्राम सेवक/ ग्राम विकास अधिकारी तथा विवाह निबंधक, ग्राम पंचायत, (सर्व)

**(मार्फतः- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद)**

विषय : विवाह नोंदणी करतांना शपथपत्र (Affidavit) ऐवजी स्वघोषणापत्र (Self Declaration) व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षाकित प्रती स्विकारणेबाबत....

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र ७१/१८-अ दिनांक ०९ मार्च, २०१५.(सोबत जोडला आहे)
२) मुवमेंट फॉर पीस ॲंड जस्टीस मुबई शहर यांचे पत्र दिनांक २२ फेब्रुवारी २०१७.

विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ व त्याखालील महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,१९९९ मधील वैधानिक तरतुदीनूसार महाराष्ट्र राज्यात विवाह मंडळांची नोंदणी व संपन्न झालेल्या विवाहांची नोंदणी करणे, आणि नोंदणी करण्यात आलेल्या विवाह मंडळांना व विवाह झालेल्या वर-वधु पक्षकारांना नोंदणीबाबतचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात निर्गमित करणे इत्यादी कामे विवाह निबंधक यांच्या मार्फत केली जातात. विवाह नोंदणी करिता आवश्यक असणाऱ्या दस्तऐवज यांची पुर्तता संबधित वधु-वर यांनी विवाह निबंधक यांच्याकडे केल्यास सबंधित विवाह निबंधकाकडून वधु-वर पक्षास विहीत नमुन्यातील शपथपत्र (Affidavit) व मूळ कागदपत्रांच्या राजपत्रीत अधिकारी/ विशेष कार्यकारी अधिकारी/ इतर सक्षम अधिकारी यांनी सांक्षांकीत केलेल्या प्रतींची मागणी केली जाते, यामुळे शासकीय कार्यालयांमध्ये नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ही बाब सामान्य नागरीकांना खर्चीक व विनाकारण त्रासदायक असल्याचे संदर्भ क्रं.२ च्या पत्रात अध्यक्ष, मुवमेंट फॉर पीस ॲंड जस्टीस मुबई शहर यांनी नमुद केल्या आहेत.

या अडचणी विचारात घेऊन नागरीकांची गैरसोय दुर करण्यासाठी प्रचलित कार्यपध्दती अधिक सुलभ करण्याचा हेतूने महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ९ मार्च २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार विवाह नोंदणी करण्यासाठी आलेल्या नागरिकांना किंवा वधु, वर (पक्षकार) निबंधकाने विहीत नमुन्यातील शपथपत्र (Affidavit) व मुळ कागदपत्राच्या राजपत्र अधिकारी, विशेष कार्यकारी अधिकारी, इतर सक्षम अधिकारी यांनी सांक्षाकीत केलेल्या प्रती ऐवजी **निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी यांनी संदर्भिय शासन निर्णयात दिलेले नमुना प्रपत्र-अ स्वयंघोषणापत्र व नमुना प्रपत्र-ब स्वयंसांक्षाकनासाठी स्वयंघोषणापत्र मध्ये कागद पत्राच्या स्वयंसाक्षांकित प्रती (Self attested copies) मध्ये माहिती विवाह नोंदणीसाठी आलेल्या नागरीक, पक्षकार, यांच्याकडून विवाह निबंधकानी भरुन घ्यावे व संबंधीताना विवाह मंडळाची विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ व त्या खालील महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम १९९९ मधील तरतुदी नुसार विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र संबंधिताना निर्गमीत करावे**

कृपया उपरोक्त परिपत्रकाची प्रत आपल्या अधिपत्याखालील सर्व ग्रामिण भागातील विवाह निबंधकांना, गट विकास अधिकारी व जिल्हा शल्य चिकीत्सक सामान्य रुग्णालय यांचे मार्फत देण्यात यावी, तसेच शहरी भागातील विवाह निबंधकांना आपले कार्यालयाकडून अवगत करावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या कार्यालयास सादर करावा.

**संचालक आरोग्य सेवा तथा**
**निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी**
**(राज्य स्तर), महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत सादर :-

मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.अप्पर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,रा.आ.अ.आयुक्तालय आरोग्य भवन, मुंबई.

प्रत सादर :-

| | |
|---|---|
| आयुक्त राजस्व विभाग | (सर्व) |
| आयुक्त महानगर पालिका | (सर्व) |
| जिल्हाधिकारी | (सर्व) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | (सर्व) |

प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ..........(सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.
जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय ..........(सर्व)

२/- कृपया आपल्या अधिपत्याखालील वैधकिय अधिक्षक तथा निबंधक विवाह उपजिल्हा रुग्णालय, ग्रामिण रुग्णालय यांना दि. ११ नोव्हेंबर २०१६ च्या अधिसुचनेनुसार विवाह नोंदणी त्यांचे स्तरावरुन करणेबाबत आदेश निर्गमीत करावेत. तसेच या परिपत्रकाची प्रत संबंधित विवाह निबंधकांना आपले कार्यालयाकडून पाठविण्याची तजवीज करावी.